# प्रकाशमार्ग

Volume 6 Issue 5 FEBRUARY 2014 Rs. 25


## प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
★ शांतता ही आपली भाषा आहे
★ ध्यान हा आपला मार्ग आहे
★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद
(मागील अंकांमधून घेतलेले वेचे, अनुवाद : जयंत देशपांडे)

खूप लोक तपोनगरला भेट देतात – ध्यानसाधक, इतर मार्गांतील साधक, जिज्ञासू, केवळ उत्सुकतेपोटी येणारे, मंत्रमुग्ध झालेले आणि असेही लोक जे अज्ञाताच्या शोधात आहेत. पृथ्वीवरच्या कोणत्याही निवडक जागेप्रमाणे, तपोनगरची पण आपली स्वप्ने आहेत, आपले अलिखित काव्य आहे आणि दिव्यत्व व सौंदर्याने परिपूर्ण अशा अव्यक्त जीवनाचे मर्म आहे. ऋषींनी तपोनगरच्या ज्या कल्पनेचे इतकी वर्षे संगोपन केले आहे, त्याच्या रूपरेषेचे आकलन फक्त दीर्घ आणि सखोल चिंतनानेच शक्य आहे. काही लोक इथे स्थायिक होण्याचा प्रयत्न करत आहेत. गोबी वाळवंटातील शंबलाबाहेर असलेल्या पहिल्या शंबलामागील म्हणजेच तपोनगरमागील कल्पनेला जाणून घेण्याची वेळ आता आली आहे.

हे आश्रयस्थान आहे जीवनाचे – शांती, प्रेम आणि उच्च पातळीची परिपूर्णता असलेल्या दैवी जीवनाचे. ध्यान हा येथील पाया आहे, श्वास आहे. पण, ह्या सुरुवातीच्या पायऱ्या आहेत ज्या प्रकाशमय आहेत. सृष्टीच्या गर्भात अनेक गोष्टी आहेत; जीवन ओसंडून वाहते आहे! किती सौंदर्य आहे! किती दैवी संभाव्यता आहे! प्रत्येक आत्मा त्याचा प्रकाश, त्याचे गाणे, त्याचे काव्य, त्याचे नृत्य व त्याची स्वप्ने घेऊन येतो. ही अशी जागा आहे जिथे ह्या सर्व गोष्टी जिवंत होतात आणि इतरांबरोबरचा सुसंवाद समृद्ध करतात.

कोणी संगीतकार इथे राहून संगीताची गहनता आजमावेल, कदाचित संगीत शिकवेलही. तो गुरुकुल पण सुरू करू शकेल आणि तपोनगराचे वातावरण संगीताने भरून टाकेल. एखादा कलाकार त्याच्या व्यासंगाचा पाठपुरावा करेल, शिकवेल आणि त्याचा स्वतःचा एखादा गट बनवू शकेल. एखादा तत्त्वचिंतक सृष्टीच्या निर्मितीमागील विचार व तथ्ये यांचे संकलन करेल. एखादा ध्यानसाधक समाधी अनुभवून त्या अवस्थेत पुष्कळ काळ राहू शकेल. दैवी शक्तींचे माध्यम बनू शकणारी व्यक्ती ऋषींसोबत घनिष्ठ संपर्क विकसित करेल आणि त्यांच्याकडून येथे राहणाऱ्या किंवा बाहेरील लोकांसाठी संदेश आणि सूचना मिळवू शकेल. किंवा एखादा माणूस फक्त प्रेम आणि शांतीचे जीवन जगेल. असे सर्व लोक, त्यांचे छंद आणि प्रयत्न एकत्र येऊन तपोनगरातील जीवन आकाराला येईल. येथील जीवन एक सकारात्मक जीवन असेल. येथे जीवनाकडे दुर्लक्ष करणे नसेल, जीवनापासून पलायन नसेल, जीवनाला दूर करणे नसेल. येथील जीवन म्हणजे प्रत्येक क्षण पूर्णपणे आणि सकारात्मकपणे जगणे असे असेल.

येथे अशा जीवनाचे संगोपन करण्यासाठी ऊर्जाक्षेत्राची निर्मिती करताना ऋषींनी खूप मेहनत घेतली आहे. तपोनगरची स्वप्ने जतन आणि साकार करण्यासाठी सूक्ष्म पातळीवर त्यांनी खूप काही निर्माण केले आहे जे साधारणपणे दिसत नाही आणि ज्ञातही होत नाही. दैवी उद्देशाचे माध्यम किंवा प्रवाहक म्हणून आपण स्वेच्छेने तपोनगरात सामील व्हायला पाहिजे. नवयुगाच्या या स्वप्नाचा एक भाग होण्यासाठी आपण आपल्या सर्व संकुचित आणि नकारात्मक प्रयत्नांना मागे सोडले पाहिजे.

मला इथे दोन पाहुणे आठवतात. एक बुद्धिजीवी होता व दुसरा गूढवादी होता. एक खूप बोलला, त्याने चर्चा केली आणि पुस्तकांतून गोळा केलेल्या ज्ञानाने त्याने सर्वांना मुग्ध केले. दुसरा सूक्ष्मदेहाने प्रवास करण्यासाठी माझ्यासोबत आला, ऋषींना भेटला आणि त्याने तपोनगरचे स्वप्न आत्मसात केले! जेव्हा लोक त्यांच्या बौद्धिक मनोऱ्यांवर गर्व करतात तेव्हा मला दुःख होते. त्यांना कळत नाही की, कोणताही किल्ला किंवा महाल हा एक तुरुंग आणि मर्यादा देखील असतो. फक्त जर ते स्वतःच उभारलेल्या तटबंदीच्या बाहेर पडू शकले तरच ते प्रचंड प्रमाणात ज्ञान आणि अनुभव मिळवू शकतील, जे देण्यासाठी ही जागा वाट पाहाते आहे.

बोस्नियाच्या शांती करारासोबत आपण नववर्षात प्रवेश केला आहे. असाच चांगला कल वाढत राहावा. जगात सर्वत्र शांती नांदो. प्रत्येकात आणि सर्वत्र प्रकाश चमकू दे. ■


मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९९०००७५२८० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

Doorways (इंग्रजीत) /
तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)
वार्षिक वर्गणी रू. ३००/–
ड्राफ्ट कृपया मानसा लाइट
एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.
कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



एका शाळेत विद्यार्थी प्रकाशाचे प्रवहन करताना

### काही ठळक घडामोडी

- २ फेब्रुवारी २०१४ रोजी तपोनगर येथे महर्षी अमर जयंती साजरी करण्यात येईल. ह्या विशेष कार्यक्रमात भाग घेण्यासाठी सर्वांचे स्वागत आहे. भाग घेण्यासाठी कृपया आपले नाव ३१–१–२०१४ पर्यंत मानसा कार्यालयात नोंदवावे ही विनंती.
- शुक्रवार, ३१ जानेवारी २०१४, 'वर्ल्ड चॅनल्स डे' च्या दिवशी हजारो शाळांतून सुमारे ८,००,००० मुले प्रकाश प्रवहन करतील. ह्या दिवशी कोणत्याही सोईस्कर वेळी आपापल्या घरी ७ मिनिटे प्रकाश प्रवहन करून ह्यात सहभागी व्हावे ही विनंती.
- १२ जानेवारी २०१४ रोजी शंबला गटाचे साधारण २०० सदस्य तपोनगरात भेटले आणि आणखी साधारण १०० सदस्य आपापल्या घरून वेबकास्ट द्वारे सहभागी झाले आणि शंबलातील महान गुरुंकडून सूक्ष्मस्तरावर दीक्षा घेतली.
- २०१४ वर्षातील 'रा' गटाची पहिली बैठक १९ जानेवारी २०१४ रोजी तपोनगरात झाली.

### महाशिवरात्री साठी ध्यानाचे विशेष तंत्र

आपल्या समोर निळ्या प्रकाशाचे प्रचंड शिवलिंग आहे अशी कल्पना करा. एका प्रकाशकणाच्या रूपात आपण त्या शिवलिंगात प्रवेश करत आहोत अशी कल्पना करा. निळ्या प्रकाशाचा अनुभव घ्या. महाशिवरात्रीपासून दहा दिवस आपण आपल्या दैनिक ध्यानाऐवजी ह्या तंत्राचा अभ्यास करू शकता.

गुरुजींचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०१ | शनिवार | महर्षी अमर जयंती |
| ०२ | रविवार | महर्षी अमर जयंती कार्यक्रम |
| ०६ | गुरुवार | रथ सप्तमी |
| ०७ | शुक्रवार | शुक्लाष्टमी |
| ०९ | रविवार | शुक्ल दशमी |
| १४ | शुक्रवार | पौर्णिमा |
| २२ | शनिवार | कृष्णाष्टमी |
| २७ | गुरुवार | महाशिवरात्री |

### तपोनगरातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| दर रविवारी | – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत |
| | – प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार ०२ | – महर्षी अमर जयंती कार्यक्रम |
| गुरुवार २७ | – महाशिवरात्री निमित्त विशेष ध्यान, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |

### महर्षी अमर जयंती कार्यक्रम तपोनगर येथे रविवार, २–२–२०१४ रोजी

| | |
|---|---|
| ११ वाजता | स्वागत |
| | वरिष्ठ साधकांचे व्याख्यान |
| | विशेष ध्यान |
| १२.३० वाजता | प्रसाद |

### आनेकल येथील कार्यक्रम

**१–२–२०१४ रोजी आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्रात सकाळी ११ वाजता महर्षी अमर जयंती साजरी करण्यात येईल.**

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

संकलन, अनुवाद : वैशाली जोशी

मी चार महिन्यांपासून दररोज दोन किंवा तीन वेळा प्रकाश प्रवहन करते आहे. माझ्या मनाला शांती व समाधान लाभले आहे. लग्नाच्या ५१ वर्षांनंतर, एप्रिल २०१३ मध्ये माझ्या पतीचे निधन झाल्याने मी खूप शोकाकुल झाले होते. माझी मुलगी जर तिच्या कुटुंबियांसोबत कारने लांबचा प्रवास करणार असली तर मला खूप दडपण यायचे आणि मी ते हाताळू शकत नव्हते. पण नियमितपणे प्रकाश प्रवहन करायला सुरू केल्यानंतर मला माझे धैर्य आणि मन:शांती परत मिळाली. दररोज वर्तमानपत्रातील ज्या दु:खद आणि भयानक घटना मी वाचते त्याचादेखील माझ्यावर परिणाम होतो. अशावेळी मी प्रकाश प्रवहन करते आणि मला मन:शांती मिळते.

– श्रीमती. विजयलक्ष्मी, आर एल सी सी, सिद्धी विनायक देवस्थान, बंगलोर

हा माझ्यासाठी, माझ्या कर्मचाऱ्यांसाठी आणि माझ्या मुलांसाठी एक अद्‌भुत अनुभव होता. मला वाटले की मी शांतीचा महासागर आहे. मी प्रकाशाच्या पलीकडे गेलो आणि मला अंतरंगात खूप हलकेपणा आणि शांती जाणवली. माझी जाणीव जितकी जास्त खोलवर शिरत होती तितकेच जास्त मला अंतरंगात हलके आणि शांत वाटत होते. मला खात्री आहे की हे तंत्र प्रत्येकाची एकाग्रता वाढवेल आणि आपण ज्या कामात स्वत:ला गुंतवू त्यात आपल्याला १००% यश मिळेल.

– श्री. संतोष कुमार, प्रशासन प्रमुख, नारायण ई–टेक्नो स्कूल, कोरामंगला शाखा, बंगलोर

पूर्वी वर्गात जेव्हा शिक्षक शिकवायचे तेव्हा आमचे विद्यार्थी त्यात खूप व्यत्यय आणायचे आणि विद्यार्थ्यांमध्ये शिस्त नव्हती. पण आता त्यात बदल झाला आहे. आमचे विद्यार्थी त्यांच्या शिक्षकांच्या आज्ञेचे पालन करतात आणि नियमितपणे शाळेला येतात. आमच्या शिक्षकांनी आणि मी विद्यार्थ्यांमध्ये खूपसे बदल अनुभवले आहेत. त्यांच्या स्मरणशक्तीत आणि एकाग्रतेत सुधारणा झाली आहे आणि त्यांच्या वर्तणुकीत बदल झाला आहे. मानसा फाउंडेशन संपूर्ण जगाला शांतीकडे वळवण्यासाठी जे प्रयत्न करत आहे त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे.

– श्री. नझीर पाशा, प्रधानाचार्य, इंडियन स्कूल, फैयाझाबाद, बंगलोर

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल सोमयाजी, अनुवाद : वैशाली जोशी

थंड हवामानात मंद गतीने नवीन वर्षाचा उगम होत असता, मानवजातीस प्रकाश युगाच्या अनंत ऋतूकडे नेणाऱ्या दैवी ऊर्जांनी कंपन पावणे तपोनगराने चालू ठेवले आहे. गेल्या वर्षात, खास करून गेल्या महिन्यात मिळालेल्या सामर्थ्याने हा विश्वास उत्पन्न केला आहे की पुढचे वर्ष उत्तम असेल.

नोव्हेंबर महिन्यात प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या यशानंतर मागच्या वर्षी डिसेंबर महिन्यात २०१४ वर्षाचे डेस्कटॉप कॅलेंडर प्रकाशित करण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात तपोनगराने एकत्र येऊन दिवाळी साजरी केली. २०१२ साली हा सण गुरुजींच्या अनंतात विलीन होण्याच्या केवळ एक आठवडा आधी आला होता जेव्हा आम्ही त्यांच्याकडून शेवटच्या वेळी वैयक्तिक आशीर्वाद घेऊ शकलो. त्या आठवणींनी हा प्रकाशांचा आनंदोत्सव धूसर केला नाही. जीवन साजरे करण्याला गुरुजींनी दिलेले महत्त्व आणि त्यांच्या मानसा कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या डोळ्यात अश्रू येऊ नयेत या त्यांच्या आग्रही कटाक्षामुळे सर्वांनी ह्या सणाचा आनंद घेतला.

शून्य मासात उपलब्ध नसलेल्या सात आध्यात्मिक मार्गदर्शकांची उणीव तपोनगरवासियांसाठी एका महान आध्यात्मिक गुरुंच्या उपस्थितीने भरून काढली ज्यांच्या वाढदिवसाचा आनंद ख्रिसमसच्या दिवशी शांतपणे ध्यान करून साजरा करण्यात आला.

डिसेंबर महिन्यातील रहिवाशांच्या भेटीत तपोनगरवासियांनी २०१३ वर्षाने त्यांची कशी परीक्षा घेतली, कसे त्यांना संपन्न केले आणि आध्यात्मिक दृष्ट्या कसे बळकट केले हे आळीपाळीने सांगितले. वर्षाच्या शेवटच्या रविवारी, अखंड ध्यानाच्या समयी तपोनगराने अखंड १२ तास ह्या जगात खूप प्रकाश प्रवाहित केला. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंत:करणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंध:काराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८–०५–२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव ; अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

एप्रिल २००९

स्वयंसेवकांनी समजून घेतले पाहिजे की कधीकधी त्यांना काही गोष्टींना मुकावे लागते. एका स्तरावर त्यांना बऱ्याच गोष्टींना मुकावे लागते हे खरे, परंतु, दुसऱ्या एका स्तरावर त्यांना त्याहूनही बरेच काही प्राप्त होत असते. आपण ऋषींकरिता काम करतो तेव्हा खऱ्या अर्थाने आपले काहीही नुकसान होत नाही.

आपण 'कामदहना'ची क्रिया करतो तेव्हा आपल्यामधील सर्व नकारात्मकता दग्ध होतात याविषयी माझ्या मनात मुळीच शंका नाही. परंतु, पुढचे वर्ष सरताना किंबहुना पुढच्याच दिवसाच्या शेवटी आपण पुन्हा नकारात्मकता गोळा केलेल्या असतात. कारण अगदी सोपे आहे. एकदा आपल्या अंतरीच्या नकारात्मकता संपविल्यानंतर आपण आमूलाग्र वेगळ्या पद्धतीने जगायला हवे असते. पण, आपण जुन्याच चाकोरीत जगत राहतो. आपण आपले दृष्टीकोन, विचारपद्धती, भावना व्यक्त करण्याच्या व जगण्याच्या पद्धती बदलत नाही. त्यामुळे पुन्हा वर्षानंतर आपल्याला कामदहन करावे लागते. आपल्यामध्ये बदल घडून येईपर्यंत दरवर्षी आपल्याला हा विधी करतच राहावा लागतो. आपल्याला कधीनाकधी परिवर्तन करावेच लागेल. हे करताना आपण पडू, झडू, पुन्हा उठू पण, आपण प्रयत्न सोडता कामा नयेत. तर मग, आपण तयारीला लागूया व जास्त प्रयत्न करूया.

जेव्हा आपण बदलण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो तेव्हा परिवर्तन होते. ऋषींशी संपर्क साधणे व देवाची प्रार्थना करणे ही आम्ही सुचवलेली पुढची पायरी आहे. तेव्हा आपल्याला सर्व साह्य मिळते. ऋषींचा विचार करून तुम्ही मदतीची वाट पाहत असता तेव्हा एक प्रकाशझोत तुमच्या मस्तकात प्रवेश करत आहे अशी कल्पना करा. देवाकडून येणाऱ्या ह्या प्रकाशात आपल्याकरिता आवश्यक ती सर्व मदत अंतर्भूत असते. त्यामध्ये माहिती, सल्ला, उपाय व उत्तर हे सर्व असते. ह्या प्रकाशात पुष्कळ ऊर्जा असतात ज्या समोरच्या प्रसंगाला तोंड देऊन त्यातून सहीसलामत बाहेर पडण्यासाठी आपल्याला पुरेशी शक्ती देतात. याचे मोल समजण्यासाठी तुम्ही प्रयत्न करून हा अनुभव घेतला पाहिजे.

याला एक दुसरी बाजू सुद्धा आहे. जेव्हा आपल्याला परिणामांची चिंता किंवा आशंका नसते तेव्हा त्यापासून निर्माण होणाऱ्या ताणापासून आपण मुक्त असतो. आपल्या समस्या आपण ऋषींवर व देवावर सोपविल्यामुळे आपल्याला चिंता करण्याचे खरेच काही कारण नसते. आपला ऋषींबरोबर संपर्क असतो तेव्हा आपल्याला माहीत असते की परिणाम चांगलाच होईल व योग्य तेच घडेल. जरी एखादेवेळी आपल्या अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळाला नाही तरीही तो आपल्या भल्याकरिताच असेल कारण आपण ऋषींच्या छत्राखाली आहोत.

कोणतेही ज्ञान मिळविणे जरी शक्य असले तरी ते ज्ञान वरच्या लोकातून मनुष्यलोकात आणणे शक्य नसते. असे अनेक कायदे व नियम आहेत जे पाळणे आपल्यावर बंधनकारक असते. उदा. इतरांना मारण्याविषयी, इतरांची हानी करण्याविषयी जे ज्ञान आहे ते सर्वसाधारणपणे इथे आणायची परवानगी नसते. तसेच या पृथ्वीवर फक्त विशिष्ट ज्ञानच अवतरू दिले जाते व तेही एका विशिष्ट वेळी. त्याआधी नाही की नंतर नाही. टीव्हीचे ज्ञान व्हायचे होते तेव्हाच झाले. इंतरनेटचे ज्ञानही पृथ्वीवर सध्याच्या सुमारासच येणे निश्चित होते. ह्या सर्वाचे एकप्रकारचे वेळापत्रक असते, तक्ता असतो ज्याचे काटेकोर पालन होते. परंतु, प्रत्येक नियमाला नेहमी अपवाद असतो. विश्वामित्र महर्षींसारखा महान गुरुच फक्त हा कायदा मोडू शकतो. ते कोणतेही ज्ञान कोणत्याही वेळी पृथ्वीवर आणू शकतात.

ज्ञानाचा प्रकाश असेल तर लोक आपल्याकडे येतात. आपल्याला जास्त प्रसिद्धी करावी लागत नाही. लोक आपणहून येतात पण प्रकाश अस्सल असला पाहिजे. माझे गुरु याचे सर्वोत्तम उदाहरण आहेत. ते कधीही बाहेर गेले नाहीत, लोक त्यांच्याकडे येत. रमण महर्षींनी त्यांचे संपूर्ण आयुष्य तिरुवन्नमलाइत घालवले आणि अख्खे जग त्यांना भेटायला तिथे येई. हे स्वाभाविक आहे. प्रत्येक मनुष्याला आयुष्यात केव्हानाकेव्हा सत्याची तळमळ लागते. असे लोक सत्याचा शोध कोणत्यानाकोणत्या मार्गाने सुरू करतात. कधी साधे एखाद्या समस्येवर उपाय शोधण्याचे निमित्त होते तर कधी थोडी शांती शोधण्याचे; आणि कसेही करून जिथे प्रकाश आहे त्याच्या अस्तित्वाबद्दल त्यांना कळते.

काहीही करून आपण दुसऱ्या माणसाबरोबर सच्चे नाते जाणीवपूर्वक निर्माण केले पाहिजे. त्याचा हुद्दा, त्याचे समाजातील स्थान विसरून जा. प्रत्येकजण मनुष्यजात आहे. जर प्रेम सच्चे असेल तर लोक स्वाभाविकपणे आपल्याकडे आकर्षित होतील. ही जागा प्रेमाच्या कंपनांनी भरून गेली पाहिजे. इथल्या लोकांवर, तुमच्यापैकी प्रत्येकावर ही जबाबदारी जास्त आहे. आपल्या स्वतःच्या जीवनात आपण जास्त प्रेम भरले पाहिजे. आपले हास्य अतिशय खरेखुरे असायला हवे.

आपण लक्षात ठेवले पाहिजे की ऋषींच्या कृपेमुळे आपण सर्वजण इथे आहोत. डोळे झाकून माझ्या मागून या. निभ्रांत व्हा. तुमची स्वतःची स्पष्टीकरणे जोडू नका. त्यामुळे भ्रांती वाढेल. हे करणे अवघड मुळीच नाही. एकच गोष्ट वाटेत अडथळा ठरू शकते, ती म्हणजे अहंकार. आपण ऋषींच्या मार्गावरून चालू. त्यांचे मार्ग विशेष असतात.

आपल्याला आध्यात्मिक प्रगती करायची असेल तर आपण आपल्या भावना लोकांमध्ये, घटनांमध्ये आणि कल्पना व मतांमध्येसुद्धा गुंतू देता कामा नयेत. अशी भावनिक गुंतवणूक कधीनाकधी एक प्रकारच्या दुःखाला आमंत्रित करते. प्रतिसादाची एक प्रकारे हक्काने अपेक्षा करणे हा भावनांचा स्वभाव आहे. जेव्हा अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही तेव्हा आपली निराशा होते व आपण दुःखी होतो. म्हणून आध्यात्मिक नाते हे सर्वोत्तम नाते आहे जे दोन आत्म्यांमध्ये असते. त्यामध्ये हक्काच्या मागण्या नसतात, अपेक्षा नसतात किंवा राग नसतो. ही नाती खरी नाती असतात व कायम टिकतात. माझे नाते आध्यात्मिक स्तरावर नेण्याचा मी सातत्याने, जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. माझे गुरु लोकांना नेहमी आध्यात्मिकरीत्या अतिशय जवळ आणि भावनिकरीत्या अतिशय दूर ठेवत असत.

बहुधा आपल्या लक्षात येते की आपलाच एखादा दोष आपल्या समस्येच्या मुळाशी असतो. आपण तो काढून टाकला पाहिजे. आपण देवाशी तद्रूप झाले पाहिजे. जेव्हा देव आपला सांगाती बनतो तेव्हा आपण कधीही चुकीची निवड करणार नाही व अडचणीत सापडणार नाही. ■

# श्री जयंत देशपांडे यांच्या व्याख्यानातील उतारे

संकलन : शोभा राव, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर

मला वाटते की अचानक उद्भवलेल्या घडामोडी वैयक्तिक आणि इतर स्तरांवर देखील अनर्थ माजवत आहेत. जर मनुष्य प्रकाशाशी सुसंगत नसणाऱ्या गोष्टींना उराशी कवटाळून बसला असेल तर त्याला इतका क्षोभ, इतकी वेदना सहन करावी लागेल की तो जवळजवळ उन्मळून पडेल. माझ्या लक्षात येते आहे की आपण ज्या परिस्थितींमधून जातो आहोत तिथे आपल्याला आपल्या आयुष्याशी निगडित एका मुद्द्यावर ठाम भूमिका घेणे कर्मप्राप्त आहे. आपल्याला योग्य व अयोग्य यातून एकाची निवड करायची आहे. ही निवड आपण आणखी लांबणीवर टाकू शकत नाही की दुरून प्रेक्षकाची भूमिका घेऊ शकत नाही. योग्य निवड करणे म्हणजे प्रकाशाची निवड करणे; ह्याला आता अतिशय महत्त्व आले आहे.

प्रकाशाशी जुळते घेणे म्हणजे चांगुलपणा, प्रामाणिकपणा आणि शांती निवडणे; प्रेम व क्षमेवर आधारित कृती निवडणे.

गुरुजींनी आपल्याला सांगितले होते की आपल्या चित्तामध्ये जर द्वेषासारखी नकारात्मकता असेल तर आपण दुष्ट शक्तींचे माध्यम बनतो. दुष्ट शक्तींचे प्रवहन करणे आपण जाणूनबुजून निवडणार नाही पण, अजाणता आपण त्यांचे माध्यम बनतो.

हीच वेळ आहे जेव्हा आपल्याकडे निवडण्याची संधी आहे, झाले गेले माफ करून पुढे जाण्याची संधी आहे. कदाचित आपल्याला काही गमावावे लागेल. कदाचित आपली प्रतिष्ठा, आपले स्थान जाईल. आपला अहंकार कदाचित मातीत मिळेल. परंतु, आपण मोठा आध्यात्मिक पल्ला गाठू. आपल्याला अमाप शांती लाभेल. गुरुजींनी आपल्याला सांगितले होते की भगवान कल्की सूक्ष्म स्तरावर प्रत्येक व्यक्तीशी संवाद साधतील. ते आपल्याला काय योग्य व काय अयोग्य ते सांगतील. कदाचित मानवी स्तरावर सुद्धा इतर व्यक्तीच्या द्वारे आपल्याला ते सांगण्यात येईल. पण कधीकधी काही लोक ऐकत नाहीत. ते अशा सल्ल्याकडे काणाडोळा करतात. मग त्यांना परिणाम भोगावे लागतात, जे स्वीकारणे व पचवणे बहुधा त्यांना जमत नाही. हे एक प्रकारचे ढासळणे आहे. परंतु, या पतनातून सावरून पुन्हा प्रगती करणे माणसाला शक्य असते. तशा संधी त्याला नेहमीच उपलब्ध असतात.

सद्य परिस्थितीमध्ये पुष्कळ अद्भुत ऊर्जांनी आपली पृथ्वी ओसंडून वाहते आहे. त्यामुळे निष्प्रेमावर बेतलेल्या चुकीच्या कृत्यांना आधार व बळ मिळणार नाही. अशा अन्याय्य कृत्यांच्या विरोधात प्रचंड संताप धगधगतो आहे. निर्मम कृत्ये चव्हाट्यावर येत आहेत. आणि काही संस्था कोसळण्याच्या बेतात आहेत. प्रलयाची प्रक्रिया तीव्र होणे अजूनही सुरूच आहे असे दिसते. पण आपल्याला चिंता करण्याचे कारण नाही. आपण प्रकाशाची निवड करतो, प्रकाशाला धरून राहतो तेव्हा आपल्याला अद्भुत मदत मिळते. ऋषींच्या छत्राखाली असणारे आपल्यासारखे लोक या गोष्टी, ही तथ्ये समजू शकतात. जर संपूर्ण जग हे समजू शकले तर कितीतरी वेदना आणि दुःख टाळता येईल.

गुरुजी नेहमी सांगायचे की हे जग आपले विद्यापीठ आहे जिथे आपण शिकतो. आपल्या आयुष्यातील विविध प्रसंग आपल्यासाठी संधी असतात आणि परीक्षाही असतात. आपली प्रगती झाली आहे की नाही ते आपल्याला परीक्षा दिल्यावरच समजते. आयुष्यात जेव्हा पेचप्रसंग उद्भवतो तेव्हा त्यातून मार्ग काढण्यासाठी इतक्या वर्षांत गोळा केलेले शहाणपण उपयोगी येते. दुसरे तथ्य हेही आहे की जसजसा आपला आध्यात्मिक विकास होतो तसतशी आपली कसोटीसुद्धा जास्त कठीण होत जाते. असे होणारच. पण आपण ऋषींच्या पावलावर पाऊल टाकून चालत असू तर आपण कसोटीतून शांतपणे व सुरळीतपणे पार पडू.

जर आपल्या आयुष्यात लहानसहान बिघाड झाला तर विकासाची संधी या दृष्टीने त्याकडे पाहावे हे चांगले, कारण अशा प्रसंगांमुळे आपण सावध राहतो व साधनेविषयी गंभीर होतो. ऋषी काहीही करू शकतात. परंतु आपण स्वबळावर जितके करू शकतो तितके ते होऊ देतात. ते आपल्याला दिलासा देतात, पुष्कळ शक्ती देतात व प्रसंग निभावून नेण्यासाठी शहाणपण देतात. आपण खात्री बाळगू शकतो की ऋषी कधीही प्रसंग हाताबाहेर जाऊ देणार नाहीत.

अमरजींनी व गुरुजींनी नवयुगाविषयी खूप काही सांगितले. ते अत्यंत विलक्षण आहे. गुरुजींनी सांगितले की प्रकाशयुगात आपल्याला चक्रांपासून मिळणाऱ्या ऊर्जांची गरज उरणार नाही कारण अत्यंत शक्तीशाली, ऊर्जारूप प्रकाश आपल्याला नैसर्गिकरीत्याच मिळेल.

प्रकाशयुगात प्रत्येकजण ज्ञानी बनेल. वाईट शक्तींची जागा प्रकाशाच्या ऊर्जा घेतील. अशा सुंदर आयुष्याची कल्पना करा जिथे स्पर्धा नसेल, द्वेष नसेल, मत्सर नसेल. तिथे रोगराई नसेल, काटे नसतील की रानटी पशू नसतील. अन्नग्रहणाची आवश्यकता असणार नाही. आपण प्रकाशावर जगू. आपण टेलीपथीच्या साह्याने परस्परसंवाद करू. त्यामुळे दळणवळणाच्या व्यवस्थेची गरज पडणार नाही. नैसर्गिक आपत्ती येणार नाहीत. सर्वत्र परिपूर्ण सुसंवाद व निरपेक्ष प्रेम नांदेल. गुरुजींनी आपल्याला सांगितले होते की प्रकाशयुगात राहणाऱ्या लोकांच्या सर्व सुप्त क्षमता कार्यान्वित होतील. लोकांना सूक्ष्मदेहाने प्रवास, काळामध्ये प्रवास आणि कारणदेहाने प्रवाससुद्धा करता येईल. प्रत्येकाला ऋषींबरोबर संपर्क साधता येईल व संवाद करता येईल. आपल्याला देवाशी थेट बोलता येईल व देवापाशी असलेले सर्व ज्ञान मिळवता येईल. जगात सीमा नसतील, सैन्यदले, पोलीसदले, न्यायालये किंवा कोणत्याही मनुष्यनिर्मित व्यवस्था नसतील. संपूर्ण जग एकसंघ असेल. संपूर्ण जगासाठी एकच दैवी व्यवस्था असेल.

संपूर्ण जग मिळून अशा सुंदर जीवनाची निवड का करू शकत नाही? कारण, लोकांजवळ इस्छास्वातंत्र्य आहे. चालू जीवनपद्धतीला ते कमालीचे चटावलेले आहेत; भयगंडाने व असुरक्षिततेच्या भावनेने ग्रस्त आहेत, ज्यामुळे वाईट शक्तींच्या मुक्त संचाराला वाव मिळतो आहे. म्हणून अधिक प्रमाणात जागृती होण्याची गरज आहे; जास्त प्रकाश प्रवाहित करण्याची गरज आहे. आपण एवढी एकच गोष्ट करू शकतो. आपण आपली निवड करून वाट पाहिली पाहिजे. आपण लोकांच्या इच्छास्वातंत्र्याचा आदर केला पाहिजे. त्यांच्या इच्छास्वातंत्र्याचा आदर करणे ही सुद्धा अशी गोष्ट आहे जी प्रकाशाकडून येते. जग प्रकाशयुगाच्या दिशेने वाटचाल करत असलेले आपण पाहतो आहोत. ह्या पृथ्वीवर आपण तथाकथित कोणत्या युगात जगतो आहोत त्याने फरक पडत नाही. आपण ईश्वराशी तद्रूप झालो असू तर खऱ्या अर्थाने आपण प्रकाशयुगातच जगत असू.

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## महर्षी अमर

जयंत देशपांडे, अनुवाद : वैशाली जोशी

त्यांचे जीवन ऋषींच्या कार्याला समर्पित होते. त्यांचे आयुष्य आणि त्यांच्या सूक्ष्मजगातील कार्यांनी, ज्यातील बहुतेक आपल्यास अज्ञात आहेत, ऋषींच्या अस्तित्वाची आणि ह्या पृथ्वीवरील जीवनाविषयी त्यांना असलेल्या प्रेमाची आणि आस्थेची वास्तविकता आपल्या समोर उघड केली. त्यांनी आपल्याला ह्या गोष्टीची जाणीव करून दिली की सत्याच्या आपल्या शोधात आणि येथील जीवन सुधारण्याच्या आपल्या संघर्षात आपण एकटे नाही. ऋषींना येथील जीवनात खोलवर रुचि आहे आणि आपल्या शोधात ते आपले मार्गदर्शन करतात आणि आपल्या संघर्षात उमेद आणि ताकद देतात.

ऋषी, जे की मुक्त आत्मे आहेत, खूप धोका पत्करून खाली आपल्या पातळीवर येतात ते फक्त त्यांचे आपल्यावर प्रेम आहे म्हणून. महर्षी अमरांचे जीवन केवळ सूक्ष्मस्तरावरच नव्हे तर भौतिक स्तरावर देखील अशा जोखीमांनी आणि साहसांनी भरलेले होते. एकदा कोणीतरी त्यांना विष प्यायला दिले, जे ते अजिबात न कचरता प्यायले पण त्यांना काहीही झाले नाही! दुसऱ्या महायुद्धात त्यांनी एकदा लोकांची सेवा करण्यासाठी १८ देह धारण केले होते!

ते उच्च सूक्ष्मजगातील ऋषींशी बोलू शकत होते, आणि ऋषींच्या मदतीने आणि स्वतःच्या प्रत्यक्ष आकलनशक्तीने त्यांनी नवीन युग आणि ह्या भूतलावर आपल्या अवतरणाबद्दल खूप ज्ञान खाली आणले. त्यांनी आध्यात्मिकतेकडे पाहण्याचा नवीन दृष्टिकोन दिला आणि तिला सामान्य माणसाच्या आवाक्यात आणले.

इतक्या असामान्य क्षमता असून आणि देवता व उच्च सूक्ष्मजगातील महान गुरुंशी त्यांचे संपर्क असून देखील त्यांनी मानवी जीवनाचा आदर केला आणि ते मानवी स्तरावरील जीवन समग्रपणे जगले. ज्याकाळी जीवनाला नाकारणे आध्यात्मिक समजले जायचे तेव्हा त्यांनी जगाला सांगितले आणि स्वतःच्या जगण्यातून देखील दाखवून दिले की ह्या भूतलावर येण्याचा आपला हेतूच मुळात मानवी जीवन अनुभवणे हा होता.

त्यांचे संपूर्ण जीवन सत्याच्या कोणत्याही शोधकाने कृतीत उतरवण्यासारखा एक प्रात्यक्षिक धडा आहे.

## महर्षी अमर

वैशाली जोशी

पंच्याण्णव वर्षांपूर्वी, सप्तर्षींचे केंद्र स्थापन करण्याच्या विशेष कार्यासाठी एक तेजोमय प्रकाश या पृथ्वीवर अवतरला. ते होते महर्षी अमर. वयाच्या बाराव्या वर्षी ते सप्तर्षींच्या १,४४,००० कार्यकर्त्यांच्या सशक्त दलात सहभागी झाले आणि त्यांनी ऋषींनी त्यांना नेमून दिलेली सूक्ष्म जगातील अनेकविध कार्ये पार पाडण्यास सुरुवात केली. त्यांचे जीवन त्यागाचे, आज्ञापालनाचे आणि ऋषींना संपूर्ण समर्पणाचे होते.

ऋषींनी दिलेल्या सूचनांप्रमाणे, त्यांनी निवडलेल्या स्थानी ध्यान करून, महर्षी अमरांनी त्या जागेस ऊर्जित केले आणि ह्या पृथ्वीवर सप्तर्षींचे केंद्र स्थापन करण्यासाठी प्रारंभिक कार्यास सुरुवात केली. तपोनगर येथे ह्या केंद्राचे बीज पेरून त्यांनी आपल्या गुरुजींच्या माध्यमातून ह्या जागेचा विकास केला. सूक्ष्म स्तरावरून मिळणाऱ्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपोनगर दुर्मिळ ज्ञानाचे आणि शक्तिशाली ऊर्जांचे भांडारगृह बनले आहे ज्याने येणाऱ्या अनेक पिढ्यांना मदत होईल.

ऋषींचे कार्य चालू ठेवण्यासाठी अनुसरण करावी लागणारी तत्त्वे महर्षी अमरांनी गुरुजींना दिली. त्यांनी दिलेली मूल्य प्रणाली आणि त्यांच्या शिकवणी ह्या मार्गास स्पष्ट दिशा देणारी मार्गदर्शक तत्त्वे बनली आहेत. उदाहरणार्थ, गावकऱ्यांशी मैत्रीपूर्ण संबंधांचा पाया घालायचा आणि अविरोधी धोरण बाळगायचे, ही त्यांनी गुरुजींना दिलेली सर्वात पहिली सूचना ह्या संस्थेचे एक अंगभूत वैशिष्ट्य बनले आहे.

जरी आपण त्यांना भेटलो नसलो तरी गुरुजींमुळे आपली त्यांच्याशी ओळख आहे. त्यांना केलेली मनःपूर्वक प्रार्थना सर्व प्रकारची संभाव्य मदत आणि नवीन संधी मिळवून देते, आणि आपल्यासाठी नवीन दरवाजे उघडतात. आपल्या जीवनात अवर्णनीय चमत्कार घडतात. आपली क्षमता ते आपल्यापेक्षा जास्त चांगली जाणतात. जरी ते ईश्वराचे कार्य करण्यात सृष्टीत इतरत्र गुंतलेले असले तरी ते आपल्यावर लक्ष ठेवून आहेत आणि सर्वकाळ आपले निरीक्षण आणि आपल्याला मदत करत असतात. ■

# प्रश्नोत्तरे

संकलन : शोभा राव, अनुवाद : सुनिता देशपांडे

**प्र: जर मी स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकत असेन तर मला कुठल्या गुरुकडे जाण्याची आवश्यकता आहे का?**

उ: तशी आवश्यकता नाही. आपण गुरुकडे काही शिकण्यासाठी जात असतो.

**प्र: गुरुंविषयी आसक्ती आपल्या आध्यात्मिक प्रगतीत अडथळा ठरू शकते का?**

उ: महर्षी अमरांनी आम्हाला सांगितले, "माझ्या पुढे जा". आपल्याला शरीर, मन आणि बुद्धीच्या पलीकडे जाणे गरजेचे आहे. आपल्याला खुद्द गुरुंच्याही पलीकडे जायला हवे. गुरुंशी सर्व संबंध तोडायचे, असा त्याचा अर्थ होत नाही. हे नाते आसक्तीवर नाही तर निःस्वार्थ प्रेमावर आधारित असते. जेव्हा आपण गोष्टींसाठी हट्ट करू लागतो तेव्हा त्याला आसक्ती म्हणता येईल. जेव्हा एखाद्या व्यक्तीला तुम्ही मानवी गुरु मानू लागता तेव्हा त्यांच्याशी तुमचे विशेष संबंध बनतील, तुमच्या संबंधांमधे विश्वास असेल. तुम्ही कदाचित दररोज त्यांच्याशी बोलणार नाही, संवाद साधणार नाही. पण तुमच्या अंतरीच्या तारा जुळलेल्या असतात. ते तुमचे मार्गदर्शन करतील. गुरुंबद्दल आसक्ती अडथळा बनणे हे माणसा माणसावर अवलंबून असते, गुरुंशी तुम्ही कसे आणि कोणत्या पातळीवर आसक्त आहात यावर ते अवलंबून असते. मौनात महर्षी अमरांबरोबर मी खूप आपुलकीचे आणि अद्भुत संवादाचे क्षण घालवले. आसक्ती पलीकडचे नाते हे खूपच सुरेख नाते असते, कारण तिथे कोणतेही दडपण नसते, मागण्या नसतात, फक्त परस्पर विश्वास आणि परस्पर आदर असतो.

**प्र: सूक्ष्म शरीराच्या वृद्ध होण्याच्या प्रक्रियेला उलट कसे फिरवता येईल?**

उ: त्याचे ज्ञान आम्हाला नाही. सध्या या पृथ्वीवर त्याबद्दलचे ज्ञान उपलब्ध नाही परंतु भविष्यात आपल्याला कदाचित ते प्राप्त होऊ शकेल.

**प्र: प्रकाश शरीर आणि सूक्ष्म शरीर या दोघांमधे काय फरक आहे?**

उ: प्रकाश शरीराबद्दल आपल्याला जवळपास काहीही माहीत नाही हे सत्य आपल्याला स्वीकारावे लागेल. माझ्या समजूतीनुसार हे भौतिक शरीरच प्रकाश शरीर बनून जाते. पण सूक्ष्मशरीर हे स्वतंत्र शरीर आहे. ते भौतिक शरीरासोबत राहाते. भौतिक शरीर कधीही सूक्ष्मशरीर बनू शकत नाही. ती दोन भिन्न शरीरे असतात. मृत्युनंतर भौतिक शरीराचा नाश होतो पण सूक्ष्म शरीर अस्तित्वात राहाते.

**प्र: कधी कधी ध्यानादरम्यान आपण ऋषींना किंवा इतर दैवी व्यक्तीमत्त्वांना पाहातो. अशा वेळी आपण काय करायला पाहिजे?**

उ: ध्यान करणे सुरू ठेवा. कदाचित कधी तो एक सच्चा अनुभव सुद्धा असू शकतो पण माझ्या माहितीप्रमाणे जवळपास असे बहुतेक अनुभव हे आपल्या मनाचे प्रक्षेपण असते. प्रक्षेपणाला बाजूला सारा. ध्यान सुरू ठेवा. चुकीचा समज करून घेऊ नका. अशा अनुभवांकडे दुर्लक्ष करा. मनाला समजण्यासाठी वेळ लागतो. आपल्याला अजूनही जास्त काही समजलेले नाही.

**प्र: आंतरिक आकाशाबद्दल किंवा अवकाशाबद्दल विस्तार करून सांगाल का?**

उ: आपल्यापैकी प्रत्येक जण आपल्या आत एक छोटे अवकाश बाळगत असतो. तुम्ही त्याला आकाश म्हणू शकता. आकाश ही कधीही रिकामी जागा नसते. आनंदमय कोश हा या लहान अवकाशाने, चिदाकाशाने वेढलेला असतो. याला आपण आंतरिक अवकाश किंवा आंतरिक आकाश म्हणू शकतो. दररोज तीन मिनिटांसाठी या चिदाकाशाला अनुभवा.

**प्र: याला अनुभवण्याने आपली जीवनशक्ती कशी शाबूत राहते?**

उ: अव्यक्त अंतराळ – चिदाकाश हे या शरीर–प्रणालीत अवगुंठित असते. जर याचा तुम्ही अनुभव घ्याल तर तुम्ही एक प्रकारची विरक्ती किंवा स्वस्थ वैराग्याचा अनुभव घ्याल. आपण या जगात राहू, आपली सर्व कामे करू, सर्व जबाबदाऱ्या सांभाळू आणि आध्यात्मिक प्रगती पण करू. जर आपण या अव्यक्त भागाचा, आंतरिक आकाशाचा दररोज केवळ तीन मिनिटे अनुभव घेतला, तर त्यामुळे आपल्याला अद्भुत विवेक आणि धैर्य मिळेल आणि इतर पुष्कळ मदत होईल. पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा अनुभव आपल्या आतील जीवन शक्ती बाहेर आणेल. हा अनुभव आपल्याला आशा आणि पुरेसा विवेक मिळवून देईल ज्यामुळे आपण अपेक्षाभंग, निराशा, अपयश अशा ज्या गोष्टींना आपल्यापैकी प्रत्येकालाच तोंड द्यावे लागते, त्यांवर मात करू शकू. हा अनुभव आपल्याला नेहमी देवाशी जोडून ठेवेल. देवाशी आपला हा संबंध इतका जवळचा असेल की, फक्त डोळे बंद करून आपण देवाशी बोलू शकू. म्हणून आंतरिक अवकाशाचा अनुभव घेणे हा साधनेचा फार महत्त्वाचा हिस्सा आहे. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Light Body & Other Realities | 100/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 3 & 4 | each 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks (Vol 3) | 150/- |
| Guruji Speaks (Vol 4) | 250/- |
| Guruji Speaks (Vol 5 & 7) | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 3 | 150/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis - Vol 1 & 2 | each 100/- |
| Pyramid Revelations | 100/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु–शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |
| आत्मा का अवतरण (Hindi) | 50/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कॅंप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2012-14
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



## गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

# आध्यात्मिक अनुभव

(संकलन – शोभा राव, अनुवाद – गुरुराज कानाडे)

दि. ३ नोव्हेंबर रोजी एकात्मतेचा अनुभव घेत असताना मला माझ्या सभोवताली सर्वत्र प्रकाश दिसला. त्यानंतर माझ्यासह सर्वकाही प्रकाशात रूपांतरित झाले. अचानकपणे त्या दिवशी सकाळी मी माझ्या मुलीला रागावत असल्याचे दृश्य मला दिसले. त्यावेळी मला प्रकाशात विसंवादाची एक लहर दिसली व थोडी बेचैनी जाणवली. ती बेचैनीची भावना देखील प्रकाशाने भरली होती. मी गुरुजींकडून ऐकले होते की जेव्हा आपण रागात असतो किंवा बेचैन असतो तेव्हा त्याचा परिणाम संपूर्ण विश्वावर होतो व तसेच जर इतर कोणी रागावलं तर त्याचा परिणाम आपल्यावर देखील होतो. त्यावेळी मी हे प्रत्यक्ष अनुभवले. त्यानंतर अगदी अवघड परिस्थितीही मी अगदी सहजपणे हाताळली व ती परिस्थिती हाताळत असताना मी परिपूर्ण एकोपा अनुभवला.

– सुनील बिसराहल्ली

नवरात्रीच्या काळात बस मधून खाली उतरत असताना अचानक माझा पाय घसरला व मी खाली पडले. मी घाबरले होते. कोणीही माझ्या मदतीस आले नाही. पण मला स्त्रीचा आवाज ऐकू आला, "तू घाबरू नकोस". ते शब्द पुन्हा माझ्या कानी पडले! मला वाटले की हा आवाज आदिशक्तीचा असावा किंवा माझ्या अंतरंगातील आवाज मला धीर देऊन मला परिस्थितीस सामोरे जाण्याचे सामर्थ्य देत होता.

– स्वर्णलता

प्रकाश आता माझा नेहमीचा सवंगडी झाला आहे. त्याने माझे आयुष्य खूप सोपे केले आहे. आता माझ्या आकलनात खूपच स्पष्टता आली आहे. मला लोकांकडून कोणत्याच अपेक्षा नाहीत.

– रश्मी रघूवंशी

मुंबई उच्च न्यायालयाने एका विशिष्ट गृहनिर्माण संस्थेतील ७ इमारतींतील ३५ मजल्यांत वसलेले ९० फ्लॅट्स जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले होते. तेथील पुष्कळ रहिवासी रडत होते व त्या आदेशाचा निषेध करीत होते. ते पाहून माझे डोळे भरुन आले व मी प्रकाशाला मदतीसाठी प्रार्थना करण्यास सुरुवात केली. नंतर काही क्षणांतच टी.व्ही. चॅनल्सवर बातमी झळकली, की सर्वोच्च न्यायालयाने ह्या आदेशाच्या अंमलबजावणीस ७ महिन्यांची स्थगिती दिली आहे. मी खूप खूश झाले! गुरुजी नेहमीच म्हणत असत की कोणालाही मदत करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे त्यांना प्रकाश पाठवणे. ह्याचा अनुभव मी पुन्हा एकदा घेतला.

– मेधा कुलकर्णी

गुरुजींच्या महासमाधी समारंभात प्रकाशित करण्यात आलेल्या दोन पुस्तकांचे कौतुक करण्यासाठी आपणास पत्र लिहण्यापासून मी स्वत:ला थांबवूच शकलो नाही. विशेषत: तपोनगरातील विविध वास्तूंबद्दलची पुस्तिका खूपच छान झाली आहे. जेव्हा ही पुस्तिका मी उचलली तेव्हा तिच्यात मला पुष्कळ प्रकाश व प्रेम जाणवले. मी खूप आनंदी व उत्साही आहे. ह्या आनंददायक दिवसाबद्दल मी आपले आभार मानतो. मला खात्री आहे की आज गुरुजी देखील खूप आनंदी असतील व त्यांना आपल्या सर्वांबद्दल अभिमान वाटत असेल.

– संदेश राणे

गुरुजींच्या महासमाधी समारंभादिवशी मानसाचे माहिती पत्रक व 'एक्सपिरीयंसेस ऑफ लाईट चॅनल्स – व्हाल्युम २' हे पुस्तक सर्वांना दिल्याबद्दल मी आपले व मानसा परिवाराचे आभार मानतो. ह्याच्यामागील जे दैवी प्रेम आहे ते व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत! पुस्तकांना फक्त हातात घेतल्यानेच त्यांतील दैवी ऊर्जांची जाणीव मला झाली.

– कमल

गुरुजींच्या महासमाधी समारंभातील भेटीगाठींमुळे माझ्यामध्ये खूपच सकारात्मक फरक झाला. मला खात्री आहे की गुरुजींच्या देहावसानानंतर आपल्यापैकी प्रत्येकालाच आपलाच एखादा भाग हरपल्यासारखे वाटत असेल. रविवारी गुरुजींचे अस्तित्व व ऊर्जा तीव्रतेने जाणवेपर्यंत मी पूर्वीची उरले नव्हते. त्या दिवशी माझ्यात उठलेल्या भावनांच्या लाटा मी व्यक्त करू शकत नाही. आता माझी खात्री पटली आहे की गुरुजी माझ्या सोबत आहेत, माझ्या सोबत चालत आहेत, माझ्याशी बोलत आहेत आणि मला मदत करण्यासाठी सदैव तत्पर आहेत. जयंतजी आपल्या सर्वांसाठी जे काही करीत आहेत त्याबद्दल मी अतिशय कृतज्ञ आहे. आता दिशाहीन असल्यासारखे अजिबात वाटत नाही.

– श्रुती सुधाकर

माझ्या जीवनातील हा टप्पा, काही अभूतपूर्व कार्ये यशस्वीपणे पूर्ण झाली म्हणूनच फलदायी झाला असे नाही तर कित्येक अकल्पित परिस्थितींबद्दल माझी अंतर्ग्राह्य शक्ती पण वाढली आहे. मानवी जीवनाचे मूल्य अधिकाधिक वाटत आहे व ते अमूल्य असून ते उगाच वायफळ कार्यात किंवा विचारांमध्ये घालविण्यासाठी नाही हे समजले आहे. गुरुजींचा आवाज नेहमी माझ्या कानी पडतो आणि कृतज्ञतेच्या अश्रूंनी माझे डोळे भरून येतात.

– जयंती नटराजन

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore - 86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande